


दैनिक
# अक्षराज
अचूक वेध,अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ७७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.३१ ऑक्टोबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## दिल्लीत रंगणार सगुण-निर्गुण भक्तीचा संगम

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, नवी दिल्ली :** भारतीय अध्यात्मिक आणि सांस्कृतिक जगताला नवी दिशा देणारे दोन महान संत, संत तुकाराम आणि संत कबीर यांच्या विचारांना संगीताच्या माध्यमातून एकत्र आणणारा एक अभूतपूर्व कार्यक्रम राजधानी दिल्लीत सादर होणार आहे. पंचम निशाद संस्थेकडून आयोजित 'तुका म्हणे, कहे कबीरा' ही विशेष संगीत मैफल गुरुवार, ६नोव्हेंबर २०२५ रोजी, सायंकाळी ६.०० वाजता, कमानी सभागृह, नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आली आहे.




**● सगुण आणि निर्गुणाचा समन्वय**

सगुण भक्तीचे प्रतीक असलेल्या संत तुकारामांचे अभंग आणि निराकार, निर्गुण तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते संत कबीरांचे दोहे, या दोन भिन्न भक्तीधारांना एकाच मंचावर आणण्याचा हा अनोखा प्रयत्न आहे. प्रसिद्ध गायिका रंजनी-गायत्री तुकारामांची भावपूर्ण अभंगवाणी सादर करतील, तर गायक भुवनेश कोमकळी कबीरांच्या गहन कबीरवाणीचे सादरीकरण करतील. या दोन महान संतांच्या विचारांमधील मूलभूत एकता आणि 'सत्याचा शाश्वत शोध' या समान उद्देशावर हा कार्यक्रम प्रकाश टाकेल.

**●● तत्त्वज्ञानाचे सखोल मार्गदर्शन**

या संगीत संवादाला अधिक वैचारिक खोली देण्यासाठी, डॉ. धनश्री लेले हिंदीमध्ये अभ्यासपूर्ण निवेदन व भाष्य करतील, ज्यामुळे श्रोत्यांना दोन्ही संतांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा सहजपणे समजू शकेल. कार्यक्रमात त्यांना मन्दार पुराणिक (तबला), ज्ञानेश्वर सोनावणे (हार्मोनियम) यांच्यासह अन्य कुशल कलाकार साथ देणार आहेत. पंचम निशादचे संस्थापक-संचालक शशी व्यास यांच्या संकल्पनेतून साकारलेला हा कार्यक्रम भक्ती आणि संगीताच्या माध्यमातून आत्मिक अनुभूती देणारा ठरेल. ६ नोव्हेंबर २०२५ रोजी होणाऱ्या या कार्यक्रमाची तिकिटे www.bookmyshow.com वर उपलब्ध आहेत.

## खा.सुरेश म्हात्रे यांनी जाणून घेतल्या शेतकऱ्यांच्या व्यथा

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.३०, शहापूर (ठाणे) :** आज भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश बाळ्यामामा म्हात्रे यांनी शहापूर दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी अवकाळी पावसामुळे शहापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतीचे प्रचंड प्रमाणात झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी त्यांच्या समवेत शहापूर तालुक्याचे तहसीलदार परमेश्वर कासुळे स्वतः उपस्थित होते. खासदार यांनी त्वरित तहसीलदारांना पंचनामे करून शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत कशी होईल यासाठी शासन स्तरावर कारवाही करून नुकसान भरपाई देण्यासाठी सूचना केल्या, यावेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या जिल्हाध्यक्षा विद्याताई वेखंडे, तालुकाध्यक्ष नंदकुमार मोगरे, ठाणे जिल्हा समन्व्यक संतोषजी शिंदे, सामाजिक न्यायचे अविनाशजी थोरात, युवक अध्यक्ष अविनाश साबळे, रंजिता दुपारे आदिसह मोठ्या प्रमाणात राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.



## दक्षिण सोलापूर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी २ हजार रुपयांची लाच घेताना रंगेहात अटक

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, सोलापूर :** अँटी करप्शन ब्युरो (एसिबी) सोलापूर घटकाने आज ३० ऑक्टोबर रोजी दक्षिण सोलापूर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी संदीप सुधाकर खरबस यांना २ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडले आहे. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर यांनी तक्रारदाराच्या तक्रारीच्या अनुषंगाने दक्षतेने पार पाडली.



मिळालेल्या माहितीनुसार, मौजे येळेगाव, तालुका दक्षिण सोलापूर येथील ग्राम पंचायतीत १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे काम करण्यात आले होते. काम पूर्ण झाल्यानंतर तक्रारदाराने त्यासंबंधित एक लाख रुपयांच्या बिलाचे मूल्यांकन प्रमाणपत्रासह प्रस्ताव दक्षिण सोलापूर पंचायत समितीकडे सादर केला होता. तक्रारदार हे या बिलाच्या मंजुरीसाठी व रकमेच्या वितरणासाठी पाठपुरावा करत असताना विस्तार अधिकारी संदीप खरबस यांनी तक्रारदाराकडून ग्रामपंचायत बँक खात्यातून बिलाची रक्कम काढण्यासाठी परवानगी देण्याच्या बदल्यात स्वतःसाठी २ हजार रुपयांची लाच मागणी केली असल्याची तक्रार करण्यात आली.

तक्रारीची ३० ऑक्टोबर रोजी अँटी करप्शन ब्युरो सोलापूर येथे नोंद घेण्यात आली. त्यानंतर लाच मागणीची पडताळणी करण्यात आली असता खरबस यांनी लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

आज जिल्हा परिषद कार्यालय, सोलापूर येथे सापळा कारवाई दरम्यान, तक्रारदाराकडून २ हजार रुपयांची लाच स्वीकारताना संदीप खरबस यांना अउइ च्या पथकाने रंगेहात पकडले. या प्रकरणी सदर बाजार पोलीस ठाणे, सोलापूर शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर करत आहे.

# ऑस्ट्रेलियाचे गर्वहरण करून भारताच्या वाघिणींची फायनलमध्ये एन्ट्री

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, नवी मुंबई :** भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात महिला विश्वचषक स्पर्धेतील सेमी फायनलचा सामना रंगला. या सामन्याचे नाणेफेक ऑस्ट्रेलियाने जिंकले आणि सामना मात्र भारताने ५ विकेट्सने जिंकला. आता भारतीय संघाने थाटामाटात फायनलमध्ये एन्ट्री घेतली आहे. आता फायनलचा सामना दक्षिण आफ्रिकेविरुद्ध मध्ये रंगेल. आता रविवारी फायनलच्या सामन्याचा थरार रंगेल.




भारतीय महिला क्रिकेट संघाने २०२५च्या विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. डीवाय पाटील स्पोर्ट्स अकादमीच्या मैदानावर भारताने गतविजेत्या ऑस्ट्रेलियाचा पराभव केला. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ३३८ धावा केल्या. प्रत्युत्तरात, जेमिमाह रॉड्रिग्जच्या शतकामुळे भारताला ४९ षटकांत लक्ष्य गाठता आले. टीम इंडियाने हा सामना ५ विकेट्सने जिंकला. विश्वचषक इतिहासातील नॉकआउट सामन्यात हा सर्वाधिक धावांचा पाठलाग आहे. आतापर्यंत पुरुषांच्या विश्वचषकातही असे घडले नव्हते. २ नोव्हेंबर रोजी विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारताचा सामना दक्षिण आफ्रिकेशी होईल. भारतासाठी जेमिमाह रॉड्रिग्जने शतक झळकावले. ती शेवटपर्यंत नाबाद राहिली आणि संघाला अंतिम फेरीत नेले. तिने १३४ चेंडूंचा सामना करत १४ चौकार मारत १२७ धावांची खेळी केली. जेमिमाहने हरमनप्रीत कौरसोबत तिसऱ्या विकेटसाठी १६७ धावांची भागीदारी केली. १५६ चेंडूंच्या या भागीदारीने सामना भारताच्या बाजूने वळवला. हरमनप्रीत कौरने शतक हुकले, तिने ८८ चेंडूत ८९ धावा केल्या. दीप्ती शर्माने १७ चेंडूत २४ धावा केल्या, तर रिचा घोषने १६ चेंडूत २६ धावा केल्या. शेवटी, अमनजोत कौर ८ चेंडूत १५ धावा करून नाबाद राहिली.

ऑस्ट्रेलियाकडून सलामीवीर फोबी लिचफिल्डने ११९ धावा केल्या. एलिस पेरी (७७ धावा) आणि ॲशले गार्डनर (६३ धावा) यांनीही अर्धशतके झळकावली. डावखुरा फिरकीपटू श्री चरणीने ४९ धावांत दोन बळी घेतले. पाहुण्या संघाने २२० धावांवरून सहा बळींत २६५ धावा केल्या, परंतु गार्डनरच्या ४५ चेंडूंच्या खेळीमुळे संघ ३०० धावांच्या पुढे गेला. संघ एक चेंडू शिल्लक असताना ३३८ धावांतच गारद झाला. लिचफिल्डने तिच्या ९३ चेंडूंच्या खेळीत १७ चौकार आणि तीन षटकार मारले. पेरीने तिच्या ८८ चेंडूंच्या खेळीत सहा चौकार आणि दोन षटकार मारले. लिचफिल्ड आणि पेरीने १३३ चेंडूंमध्ये दुसऱ्या विकेटसाठी १५५ धावांची भागीदारी केली. डावाच्या सुरुवातीला, भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने तिसऱ्या षटकात तिचा झेल सोडत एलिसा हिलीला दिलासा दिला. प्लेइंग इलेव्हनमध्ये परतलेली ऑस्ट्रेलियन कर्णधार सहाव्या षटकात स्वस्तात बाद झाली. लिचफिल्डची शानदार खेळी अमनजोत कौरच्या चेंडूने आदळली, जी तिने डीप फाइन लेगवर खेळण्याचा प्रयत्न केला, परंतु ती तिच्या मधल्या स्टंपला उखडून टाकली. पेरीने तिला चांगली साथ दिली आणि अर्धशतकासह संघात महत्त्वपूर्ण योगदान दिले. तिला राधा यादवने बाद केले. भारतीय गोलंदाजांना शिस्तबद्ध राहण्याची आवश्यकता होती, परंतु क्रांती गौड लाईन आणि लेंथमध्ये तितकी चांगली राहिली नाही आणि रेणुका सिंग इनस्विंग साध्य करण्यात अपयशी ठरली. भारताची सर्वाधिक विकेट घेणारी गोलंदाज दीप्ती (२/७३) शेवटच्या क्षणी दोन विकेट घेतल्या.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांवर नमो टूरिझम सेंटर काढल्यास फोडून टाका

## मनसे प्रमुख राज ठाकरे यांचा मन सैनिकांना आदेश ! शनिवारी 1 नोव्हेंबरचा मोर्चा दणदणीत करा



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३०, मुंबई :** मुख्यमंत्री पदासाठी लाचारी आणि चाटूगिरी सुरू आहे. पंतप्रधाना खुश करण्यासाठी चक्क छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवनेरी, राजगड, रायगड किल्लूयावर नमो टूरिझम सेंटर काढले जाणार आहेत. जर महाराजांच्या किल्लूयांवर नमो टूरिझम सेंटर उभे केल्यास ते फोडून टाका, असा सणसणीत इशारा महाराष्ट्र नवनिमर्ण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मनसैनिकांना येथे दिला.

मतचोरीमुळे मनसेला पराभव पत्करावा लागला. एक वर्ष लागू दे, पण मतदार याद्या आदी स्वच्छ करा, असे इशाराही त्यांनी निवडणूक आयोगाला दिला. तसेच १ नोव्हेंबर रोजी होणार मोर्चा दणदणीत करा, असे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

गुरुवारी वांद्रे येथील रंगशारदा सभागृहात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मनसैनिकांशी संवाद साधला. १ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मोर्चाला ते स्वतः मुंबई लोकलने येणार आहेत. या मोर्चाच्या आगीची धग दिल्लीपर्यंत लागली पाहिजे. तेव्हा मोर्चा दणदणीत करा. घराघरात जाऊन कार्यकत्र्यांनी चेहरे दाखवा. लोकांना कळू द्या. मोर्चात कोण उतरले आहे असे कळकळीचे आवाहन त्यांनी कार्यकर्त्यांना यावेळी केले.

यावेळी राज यांनी ईव्हीएममधून मतांची चोरी कशी होते याचे प्रात्यक्षिक घडवून आणले. मतांची ही चोरी म्हणजे महाराष्ट्रातील प्रामाणिक मतदारांचा अपमान आहे. मनसेला सुद्धा लोकांनी भर भरून मतदान केले आहे. पण मत चोरीमुळे पराभव पत्करावा लागला असेही ते म्हणाले.

महाराष्ट्रातील राजकारण प्रचंड खालावले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५व्या वाढदिवसांचे औचित्य साधून थेट छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवनेरी, राजगड, रायगड किल्लूयावर नमो टूरिझम सेंटर काढले जाणार आहेत. मुख्यमंत्रीपदासाठी ही लाचारी आणि चाटूगिरी सुरू आहे. सत्ता डोळ्यात गेली की आम्ही काहीही करू शकतो असे महाराष्ट्रातील सत्ताधारी वागत आहेत. जर किल्लूयावर नमो टूरिझम सेंटर उभे केल्यास कोणाचीही पर्वा न करता ते फोडून टाका, असा थेट आदेश मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मनसैनिकांना दिला. त्यामुळे शनिवारी होणाऱ्या मविआ आणि मनसे संयुक्त मोर्चाकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.

## लेखाशिर्ष २५१५ अंतर्गत २ कोटी ५० लाखांचा विकासनिधी मंजूर : आ. दाते

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार काशिनाथ दाते सर यांच्या सततच्या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत लेखाशिर्ष २५१५-१२३८ अंतर्गत एकूण ₹२ कोटी ५० लाखांचा निधी मंजूर झाला असून, या निधीच्या माध्यमातून मतदारसंघातील विविध गावच्या महत्त्वाच्या विकासकामांना गती मिळणार असल्याची माहिती आमदार काशिनाथ दाते सर यांनी दिली. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, या मंजुरीत मंदिर परिसर सुशोभीकरण, रस्ते सुधारणा, सभामंडप बांधकाम, पिण्याच्या पाण्याची सुविधा, तसेच ग्रामपंचायत स्तरावरील सार्वजनिक सोयी-सुविधांच्या उभारणीसाठी आवश्यक निधीचा समावेश आहे. जवळे, कडूस पाबळ, चिंचोली, गांजीभोयरे, तिखोल, कान्हुर पठार, नारायणगव्हाण, पिंपळगाव रोठा, मांडवे खुर्द, शहांजापूर, नांदगाव, अरणगाव, भोयरे खुर्द, भोयरे पठार, हिवरे झरे व वाकोडी गावांमधील विकासकामे या निधीतून हाती घेण्यात येणार आहेत.



या निधीच्या मंजुरीसाठी विशेष सहकार्य करणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आणि जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी पारनेर नगर विधानसभा मतदारसंघातील जनतेच्या वतीने यावेळी मनःपूर्वक आभार मानले. मतदारसंघातील सर्व गावांचा संतुलित आणि शाश्वत विकास हेच माझे ध्येय आहे. शासनाच्या माध्यमातून विकासाच्या प्रत्येक शक्य संधीचा लाभ आपल्या मतदारसंघाला मिळवून देण्यासाठी मी व माझ्या महायुतीतील सर्व सहकाऱ्यांचे सातत्याने प्रयत्न सुरू राहतील असेही आमदार दाते यांनी यावेळी स्पष्ट केले.




## 'पेंडिंग इश्यू'...

जुन्या कार्यकर्त्यांनी प्रेम, विश्वास आणि समर्थन दिले म्हणून पक्षाला चांगले दिवस आले आहेत. डॉ. राजीव पोतदार यांच्यासारखे प्रामाणिक कार्यकर्ते मी माझ्या काळात जोपासले. आता मी संघटनेत नाही. बावनकुळे साहेब नेतृत्व करतात. मात्र ते न्याय देत नाहीत, याचे मला दु:ख आहे. घर की मुर्गी दाल बराबर असते. बाहेरचा सावजी चिकन मसाला चांगला लागतो. जुन्या कार्यकर्त्यांची कदर केली नाही, तर जेवढ्या जोराने वरती चालले आहात, तेवढ्या जोराने खाली आल्याशिवाय राहणार नाही' केंद्रीय मंत्री नितीन गडकरी याच्या कळमेश्वरमधील भाषणाचा सध्या राजकीय वर्तुळात जोरदार 'इको' आहे.

सावनेरमधून २०१९मध्ये सुनील केदारांनी ज्यांना हरविले, तेच हे राजीव पोतदार. प्रामाणिक आहेत. डॉक्टरकी बाजूला सारून राजकारणात आले. गडकरी बेधडक आहेत. ठरावीक अंतराने जुन्या महाविद्यालयीन मित्रांसोबत धापेवाड्याला जाऊन भरीत भाकरीचा बेत हाणणे हा रिवाज पाळला आहे. त्यांचा मोकळेपणा अनेकांना आवडतो. काहींना चांगलाच खटकतो. गडकरी कधीही पश्चातबुद्धीतून सारवासारव करीत नाहीत. त्यांच्या भाषणात 'कोटीच्या कोटी उड्डाणे' असतात. ज्यांचा जाहीर बिनधास्तपणा एवढा टोकदार आहे, त्यांच्यासोबतच्या खासगी गप्पांमधील रोचकतेची अनेकांना आस असते. या निडरतेने गडकरींना अनेकदा अडचणीत आणले.

इथेनॉल प्रकरणात त्यांच्यावर राजकीय कुरघोडी झाली; मात्र ती याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. नागपुरातील फुटाळा तलावातील संगीत कारंजासाठी ७५ कोटींहून अधिक रक्कम खर्च झाली. हा त्यांचा 'ड्रीम प्रोजेक्ट' आहे. स्वच्छ असोसिएशनने त्याविरोधात न्यायालयाचे दार ठोठावले. सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळल्याने हा प्रकल्प सुरू होईल. एमएसआयडीसीला नागपुरात सहा मोठे मार्केट बनविण्याचे कंत्राट सोपविण्यात आले आहे. अशा २० बाजारपेठांची उपराजधानीला गरज असल्याचे गडकरी म्हणतात. विदर्भातील खेळाडूंसाठी प्रत्येक प्रमुख मार्गावर क्रीडा केंद्र होते आहे. दिवंगत केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी उमरेडला राष्ट्रीय औषध शिक्षण आणि संशोधन संस्था (नायपर) प्रकल्प मंजूर केला होता. तो प्रकल्प रद्द झाल्याची खंत मात्र नागपूरकरांना आहे.

अंजली दमानियांनी मागे गडकरींविरोधात आरोप केले होते. त्यांनी नागपुरातून निवडणूकही लढविली होती. त्यांचे शंकानिरसन अद्याप झालेले नाही. गडकरी खुलाशांच्या फंदात पडत नाहीत. पक्षभेद टाळून शेकडो कार्यकर्त्यांना ते भेटतात. एकदा नागपुरातील गुंडाचे निधन झाले. त्याच्या मुलीच्या लग्नाला गेल्यास राजकीय अडचण होईल, असे जवळच्यांनी समजावले. गडकरी बधले नाहीत. लग्नानंतर प्रसारित होणारे फोटोही त्यांनी थांबविले नाहीत. ही दबंग प्रतिमा त्यांना चांगलीच चिकटली आहे. 'बिटविन द लाइन' वगैरे बोलण्यापेक्षा थेट तिरंदाजीत त्यांचा हात कुणी पकडू शकत नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्यातील दुरावा शोधण्याचा प्रयत्न अनेक नेते करतात. फडणवीस नेहमीच गडकरींचा उल्लेख मार्गदर्शक नेते असा करतात. एखाद्या प्रकल्पात राज्याने केलेल्या मदतीची नोंद घेताना फडणवीस यांचे योगदान गडकरी आवर्जून सांगतात. पक्षविरहित भावनेने जिव्हाळा जपणे हे या नेत्यांमधील साम्य आहे. संघ हे विश्वविद्यालय आहे आणि आपण त्यातील विद्यार्थी असल्याची भावना दोहोंमध्येही आहे. गडकरींनी पोतदारांचा विषय काढला. कृष्णा खोपडे, नाना शामकुळे, सुधाकर देशमुख या परपक्षातील नेत्यांना गडकरींनीच भाजपत आणले, ही कुजबूज यानिमित्ताने कार्यकर्त्यांमध्ये झाली.

त्या भाषणात गडकरींचा एक उच्चार महत्त्वाचा होता. 'बऱ्याच दिवसांपासून माझे काही इश्यू पेंडिंग आहेत' या हसतहसत बोललेल्या वाक्याने अनेकांची मने धास्तावली. नगरपालिका निवडणुकीनंतर देवेंद्रजी, बावनकुळे आणि आशिष देशमुख जिल्ह्याकडे लक्ष देतील, अशी पुस्ती गडकरींनी भलेही जोडली; 'पेंडिंग इश्यू'चा रवंथ आता सुरू आहे. पक्षाला आयातीत सावजी मसाला आणि घरच्या डाळीचा रुचकर मेळ रेंगाळत ठेवता येणार नाही. नवा 'तडका' लवकरच धडकू शकेल.

# तुळशी विवाह प्रथेमागील व्यापक दृष्टिकोन !

भारतात कार्तिक शुद्ध एकादशी ते कार्तिक पौर्णिमा या कालावधीत घरोघरी तुळशी विवाह लावण्याचा प्रघात आहे. यंदा हा योग २ ते ५ नोव्हेंबर दरम्यान असणार आहे. बहुतांश ठिकाणी द्वादशीला तुळशी विवाह केले जातात. कार्तिक शुद्ध एकादशीला प्रबोधिनी एकादशी असेही म्हणतात. या दिवशी श्री विष्णू निद्रावस्थेतून जागृत होतात आणि चतुर्मास संपतो. श्री विष्णूंच्या जागृतीचा जो उत्सव करतात त्याला प्रबोध उत्सव असे म्हणतात. त्याचाच एक भाग म्हणून तुळशी सोबत श्री विष्णूंचा विवाह लावला जातो. तुळशी विवाहानंतर देशभरात नियोजित विवाह लागायला सुरुवात होते. तुळशी विवाहला श्री महालक्ष्मी आणी श्री विष्णूंच्या विवाहाचे प्रतीक मानले जाते. तूलशी विवाह हे एक व्रत मानले गेले आहे. हे व्रत करणाऱ्याला कन्यादानाचे फल मिळते असे मानले जाते. घरच्या कन्येस श्रीकृष्णासारखा आदर्श वर मिळावा यासाठीही दारात तुळशी विवाह करण्याची प्रथा आहे. त्यामुळे भारतात अनेक ठिकाणी घरोघरी तुळशी विवाह केले जातात. हिंदू धर्मात तुळस ही अत्यंत पवित्र मानली जाते. त्यामुळे प्रत्येकाच्या दारात ती पाहायला मिळते.

भगवान शिवाचाच अंश असलेला जालंधर नावाचा राक्षस त्याच्या अमाप शक्तीने उन्मत्त झाला होता. सर्व देवांसह इंद्रालाही त्याने पराभूत केले. त्याने विष्णू लोकावर आक्रमण करण्याचा प्रयत्न केला; मात्र देवी महालक्ष्मीने त्याला आपण बहीण भावासारखे आहोत हे समजावल्यावर त्याने कैलासावर आक्रमण करून देवी पार्वतीला पत्नी बनवण्याची योजना आखली. ज्यामुळे देवी पार्वती क्रोधीत झाल्या आणि श्री महादेवांना जालंधरशी युद्ध करण्यासाठी सिद्ध व्हावे लागले. जालंधरची पत्नी वृंदा ही पतिव्रता असल्याने तिच्या पातिव्रत्य धर्मामुळे जालंधरला शक्ती मिळत होती. परिणामी महादेवांनाही त्याला पराभूत करता येत नव्हते, जालंधरला पराभूत करण्याचा एकमेव मार्ग त्याच्या शक्तीचा स्रोत तोडणे हाच होता. अखेर भगवान श्रीविष्णूंनी जालंधरचे मायावी रूप घेतले आणि ते वृंदाच्या घरी गेले. जालंधरला पाहिल्यावर ती त्याच्याशी त्याच्या पत्नीप्रमाणे वागू लागली. जालंधरच्या रूपात त्यावेळी भगवान श्री विष्णू असल्याने वृंदाचे पातिव्रत्य भंग पावले ज्यामुळे महादेवांना जालंधरचा वध करता आला, वृंदाच्या जेव्हा हे लक्षात आले तेव्हा तिने क्रोधीत होऊन श्री विष्णूंना श्राप दिला, 'ज्या प्रकारे छळ करून तुम्ही मला पती वियोग दिला आहे त्याचप्रमाणे तुमच्याही पत्नीचे छळपूर्वक हरण होऊन स्त्री वियोग सहन करण्यासाठी तुम्हाला मृत्यू लोकात जन्म घ्यावा लागेल'. पुढे श्री राम अवतारात श्रीविष्णूंना माता सीतेच्या रूपात पत्नीवियोग सहन करावा लागला. वृंदा पतीसोबत सती गेली. ज्या जागी ती सती गेली त्या जागी तुळशीचे रोप उत्पन्न झाले. ही तुळस श्रीविष्णूंना अत्यंत



**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

प्रिय आहे. एका कथेनुसार वृंदाने श्री विष्णूंना श्राप देऊन शाळीग्राम बनवले. त्यामुळे तुळशी विवाहाच्या दिवशी तुळशीसोबत श्री विष्णूचे रूप म्हणून शाळिग्राम ठेऊन त्यांचे लग्न लावले जाते. तुळशीविना श्री विष्णूची किंवा शाळीग्रामची पूजा कधीच पूर्ण होत नाही.

तुळस म्हणजे आपल्या घरातील कन्याच आहे या भावाने तिचे लग्न लावले जाते. दारातील तुळशी वृंदावनाला किंवा कुंडीला गेरू आणि चुन्याच्या साहाय्याने रंगरंगोटी केली जाते. कुंडीत बोर, चिंच, आवळा, सिताफळ, कांद्याची पात ठेवतात. दारात आणि अंगणात रांगोळी काढली जाते. कुटुंबातील कर्ता पुरुष तुळशीची आणि श्रीकृष्णाच्या मूर्तीची पूजा करतो. नंतर त्यांना हळद व तेल लावून मंगल स्नान घातले जाते. तुळशीला आणि श्रीकृष्णाच्या मूर्तीला बाशिंग बांधले जाते. तुळशीला नवीन वस्त्र पांघरतात आणि त्यावर मांडव म्हणून उसाची अथवा धांड्याची खोपटी ठेवतात. काही जण तुळशीच्या रोपट्याला साडी देखील नेसवतात.तुळशीला नवरीसारखे सजवण्यात येते. तिला साडी, चोळी, नथ, सोन्याचे दागिने घालतात. सोन्याचे मंगळसूत्र, चांदीची जोडवी घालतात. बाळकृष्ण आणि तुळस या दोघांमध्ये अंतरपाट धरून मंगलाष्टके म्हणून त्यांचा विवाह लावला जातो. घरातील स्त्री तुळशीची ओटी भरते. तुळशीची आणि श्रीकृष्णाची आरती केली जाते. गोडाचा नैवेद्य दाखवला जातो. बऱ्याच ठिकाणी प्रसाद म्हणून ऊस आणि चुरमुरे वाटले जातात. गोवा, दीव आणि दमण येथे तुळशी विवाह सार्वजनिकरीत्या साजरा केला जातो. तुळशीची आणि बाळकृष्णाची वाजत गाजत सरकारी इतमामात मिरवणूक काढली जाते. तुळस भारताच्या सर्व प्रांतात आणि सर्व वातावरणात उगवणारी वनस्पती आहे. तुळस केवळ पूजनीय आहे म्हणून ती दारासमोर लावली जात नाही, तर तिचे अनेक आयुर्वेदिक गुणधर्मही आहेत. तुळस नेहेमी सकारात्मक ऊर्जा प्रक्षेपित करत असते हे शास्त्रीयदृष्ट्याही सिद्ध झाले आहे. ज्या घराच्या दारात तुळस असते त्या घरात आजारपण कमी येते असे म्हटले जाते. हिंदू धर्मात तुळशीला अनन्यसाधारण महत्व आहे. तुळशीला पापनाशिनी असेही म्हटले जाते. तुळशीचे वन असलेल्या परिसरातील कोसभर भूमी गंगेसारखी पवित्र बनते असा संदर्भ स्कन्दपुराणात आढळतो. तुळशीच्या वनस्पतीत मुळापासून अग्रापर्यंत सर्व देवता वास्तव्य करतात', असे म्हटले जाते. देवाला नैवेद्य दाखवतांना तुळशीच्या पानांचा वापर केल्याने नैवेद्य देवतेपर्यंत लवकर पोहोचतो तसेच तो अधिक सात्विक बनतो.

श्वासाची दुर्गंधी घालवण्यासाठी तुळस अत्यंत उपयुक्त आहे. यासाठी सकाळी आणि सायंकाळी तुळशीची एक ते दोन पाने चघळावीत. तुळशीची ताजी पाने प्रतिदिन खाल्याने शरीरातील रोगप्रतिकारक शक्ती वाढते. शरीरातील टॉक्सिस बाहेर काढून फुप्फुसांची कार्यक्षमता वाढवण्याचेही कामही तुळस करते. सर्दीमुळे कफ़, खोकला झाल्यास त्यावर तुळस अत्यंत गुणकारी आहे. सर्दीसाठी काढा बनवताना त्यामध्ये तुळशीची पाने टाकावीत. मासिक पाळी अनियमित येण्याच्या समस्येमध्येही तुळस खाणे लाभकारक आहे. स्मरणशक्ती वाढीसाठी लहान मुलांना तुळशीची २-३ पाने नियमित खायला द्यावीत. तुळशीमधील विषाणूनाशक गुणधर्मामुळे जखम लवकर बरी होण्यासाठी तुळस तुरटीमध्ये मिश्र करून लावली जाते. तुळशीच्या सेवनामुळे मेंदूला ऊर्जा मिळते त्यामुळे डोकेदुखीच्या समस्येतही तुळस लाभदायक आहे. तुळशीच्या नियमित सेवनाने शरीरातील ऊर्जा संतुलित राहते परिणामी ताण तणावांपासूनही मुक्ती मिळते. असे एकना अनेक लाभ तुळशीपासून मिळतात. दर वर्षी दारात तुळशीचे लग्न लावावे असा हिंदू धर्मात प्रघात आहे. त्यामागे कथेची जोड असली तरी लग्न लावण्यासाठी का होईना प्रत्येक कुटुंबाने आपल्या दारासमोर तुळशी वृंदावन करून त्यात तुळस लावावी आणि वर्षभर तिचे पोषण करावे हा यामागील हेतू असावा. कारण त्यायोगे घरात प्राणवायूसह सकारात्मक ऊर्जेचा स्रोत येत राहावा, तुळशीच्या पानाच्या नियमित सेवनाने लहान सहन आजार दूर राहावेत, कुटुंबातील सर्वांची प्रकृती सुदृढ राहावी. कुटुंबाचे आरोग्य सुरक्षित राहावे जेणेकरून कुटुंबात सुख, समाधान आणि शांती कायम टिकून राहील. आपल्या प्राचीन ऋषी मुनींचे संशोधन किती उदात्त आणि अत्युच्च पातळीचे होते हे या एका उदाहरणावरून आपल्या लक्षात आले असेल.

## वास्तव्य...

माहीत नाही मुळी
इहलोकी वास्तव्य
जाण रे वास्तवाची
नक्की असे गंतव्य

कर्म आपल्याहाती
त्या हाती भवितव्य
जाताइथे सोडायचे
स्थावर जंगम द्रव्य

जमेल तितुके नाव
करे किर्तीवान भव्य
वारसदार करत राहे
श्राध्द सव्यअपसव्य

असेपर्यंत निभावावे
इमाने समस्तकर्तव्य
करू न शकेकाहीचं
पत्नीला येता वैधव्य

मागे राहीलं कलेवर
शून्यचं त्याचे क्रेतव्य
हतबलअसा माणूस
नजमेल मृत्यूजेतव्य

क्षणभर न थांबू शके
परिपूर्ण होई स्थातव्य
जीवनमनुजा आपुले
असे खूपसे ध्यातव्य

इहलोक नि परलोक
कळतेमनासि मंतव्य
गूढ जीवन मृत्यू फेरा
असे बुद्धीसीं बोधव्य

तन जाळे कर्पुरासम
आत्मा मात्र अद्राव्य
करावा किती प्रयास
अमरत्व रे असंभाव्य

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल

आज ३१ ऑक्टोबर, भारताचे पहिले उपपंतप्रधान, पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज १५० वी जयंती. सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी आणंद या छोट्याशा गावात झाला.

त्यांचे वडील झव्हेरिभाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. त्यामुळे लहानपणीच त्यांना देशभक्तीचे बाळकडू मिळाले. त्यांच्या संपुर्ण कुटुंबावर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव होता. सरदार पटेल हे हुशार विद्यार्थी होते. त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण करून बोरसाड येथे वकिली सुरू केली. एक अभ्यासू वकील म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले पुढे ते बॅरिस्टर झाले. बॅरिस्टर झाल्यावर अहमदाबाद येथे त्यांनी वकिली सुरू केली. अल्पावधीतच एक निष्णात वकील म्हणून त्यांची कीर्ती देशभर पसरली. वकिलीसोबत त्यांना राजकारणाचीही आवड होती त्यामुळे त्यांनी अहमदाबाद पालिकेची निवडणूक लढवली त्यांनी ती निवडणूक सहज जिंकली. राजकारणात आल्यावर त्यांना जनतेचे मूलभूत प्रश्न समजू लागले. १९१७ साली खेडा जिल्ह्यात प्रचंड पाऊस झाला त्यामुळे खरिपाचे पीक वाया गेले. पुढे उंदराचा सुळसुळाट आणि किटकांमुळे रब्बीचे पीकही गेले त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. त्यातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या हाती २५ टक्क्यांपेक्षाही कमी उत्पादन येईल अशी परिस्थिती निर्माण झाली. नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सूट मिळावी, शेतसाऱ्याची वसुली पुढे ढकलावी यासाठी त्यांनी १८ हजार शेतकऱ्यांच्या सह्या असलेले निवेदन सरकारकडे दिले पण सरकारने त्याची दखल न घेता शेतसारा वसुलीसाठी शेतकऱ्यांवर जप्तीचे आदेश दिले त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. महात्मा गांधी यांनी सक्तीच्या शेतसारा वसुली विरोधात खेडा येथे सत्याग्रह चळवळ सुरू केली. या चळवळीचे नेतृत्व त्यांनी सरदार पटेल यांच्याकडे सोपवले. शेतकऱ्यांचे हे आंदोलन त्यांनी अत्यंत निर्धाराने यशस्वी केले. या आंदोलनात त्यांनी केलेल्या नेतृत्वाने महात्मा गांधी भारावून गेले. पुढे महात्मा गांधी यांच्या प्रत्येक चळवळीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला. नेतृत्वाप्रमाणेच त्यांचे वक्तृत्वही प्रभावी होते. आपल्या वक्तृत्वाने जनसामान्यांना प्रभावित करणाऱ्या सरदार पटेलांनी १९२८ साली सायमन कमिशन विरोधात पुकारलेल्या बारडोली सत्याग्रहादरम्यान लोकांना आपल्या महान विचारांनी प्रभावित केले त्यामुळे इंग्रजांनी अवाजवी वाढवलेल्या करांना न भरण्यावर जनता सहमत झाली त्यामुळे ब्रिटिश व्हाइसरॉयला पराभव पत्करावा लागला. या आंदोलनात आपल्या सशक्त नेतृत्वाने वल्लभभाई पटेल जनतेत चांगलेच प्रसिद्ध झाले आणि बारडोलीतील लोक त्यांना सरदार म्हणू लागले त्यामुळे त्यांच्या नावापुढे सरदार जोडले जाऊ लागले. १९३० साली सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना इंग्रजांनी अटक केली. त्यांना पाच वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला त्यावेळीही त्यांना अटक झाली. १९४६ झाली स्थापन झालेल्या हंगामी सरकारमध्ये ते गृहमंत्री होते. गृहमंत्री या नात्याने त्यांनी भारत पाक फाळणीच्या चर्चेमध्ये निर्णायक भूमिका बजावली. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात ते उपपंतप्रधान बनले. त्यांच्याकडे गृहखाते, माहिती आणि नभोवाणी, संस्थानचा प्रश्न व निर्वासितांचा प्रश्न व निर्वासितांचे प्रश्न सारखे महत्वाचे खाते देण्यात आले. स्वातंत्र्य भारताचे गृहमंत्री झाल्यावर सरदार पटेल यांनी सर्वात आधी भारतातील वेगवेगळ्या संस्थानातील राजांना आपल्या दूरदर्शीपणाचा आणि बुद्धिमत्तेचा वापर करून भारतात विलीन होण्याची सूचना केली. बहुतांश संस्थानांनी याला सहमती दर्शवून भारतात विलीन झाले पण जुनागड, हैदराबादचा निजाम, जम्मू काश्मीरच्या राजांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला. सरदार पटेलांनी आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या बळावर सैन्याचा वापर करीत या तिन्ही संस्थानांना भारतात विलीन केले. सरदार पटेल यांनी तत्कालीन ५६५ संस्थाने भारतात विलीन करून एकसंध भारत निर्माण केला त्यांची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच होती. त्यांच्या याच कामगिरीने त्यांना लोहपुरुष ही पदवी देण्यात आली. १९५० साली त्यांचे स्वास्थ्य बिघडू लागले. २ नोव्हेंबर १९५० ला त्यांचे स्वास्थ्य इतके बिघडले की ते अंथरुणावरुन उठण्यास देखील असमर्थ होते. पुढे १५ डिसेंबर १९५० रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली. सरदार पटेल यांना जातीदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# शेतकऱ्यांचा दु:खहर्ता कोण ? खेड्यातचं कृषीपूरक उद्योग उभारावेत...

आपला भारत देश जगामध्ये कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. तो जगाचा पोशिंदा आहे. मात्र देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे लोटली तरीही बळी राजाची आर्थिक सुबत्ता सुधारली नाही हे वास्तव नाकारता येत नाही. नोकरांना विविध वेतन आयोग लागू होतात. मात्र शेतकऱ्याला कोणता आयोग आहे का ? कोणतीही आपत्ती आली की, पहिल्यांदा शेतकऱ्याला कात्री लावली जाते याला काय म्हणावे. शेतकरी रात्रंदिवस काबाडकष्ट करुन वेळेप्रसंगी हिंस्र प्राण्यांची गय न करता आपली शेतजमीन पिकवतो. मात्र त्याच्या उत्पादनाला आजही योग्य दर मिळनासा झाला आहे. वातावरणातील होणाऱ्या सततच्या बदलामुळे शेती व्यवसाय पूर्णपणे बेभरवशाचा झाल्याने आणि ग्रामीण भागात उद्योगधंदे नसल्यामुळे खेड्यातील लोक शहरांकडे स्थलांतर करत आहेत. आजची तरुणाई शेती करण्यास निरुत्साही दिसुन येते आहे.

शेतीतून फार काही साद्य होत नसल्याने युवा वर्ग नोकरी, धंद्यासाठी खेड्यांतून शहरांकडे धाव घेत आहेत या सर्वाची परिणीती शेतजमीन ओस पडून झपाट्याने शहरीकरण वाढत असल्याने तेथेही जमिन कमी पडत आहे. शेतजमिनी, माळराने, जंगले यासाठीच असणाऱ्या ठिकाणीचं घरांची निर्मिती होते आहे. त्यामुळे एकप्रकारे हे निसर्गावर अतिक्रमणचं म्हणावे लागेल. शेतकऱ्यांच्या कृषीमालाला हमीभाव मिळत नसल्याने लोक शेती व्यवसाय सोडून शहरांकडे वळत आहेत हे अद्योगतीकडे नेणारे आहे. शहरीकरण वाढले आणि जमिन कमी पडू लागली तर भविष्यतात अन्नधान्यापासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी भारत सरकारने शेती उद्योगासाठी कल्याणकारी योजनां राबवाव्यात, शेतकऱ्यांना हमी भाव द्यावा, खेड्यातचं कृषीपूरक, विविध छोट्या - मोठ्या उद्योगधंद्याची उभारणी करावी. त्यामुळे शेतकरी आणि तरुणाई गावातचं राहुन आपली आर्थिक प्रगती साधतील त्यामुळे वाढत्या शहरीकरणाला आळा बसेल !

**– राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

